डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्याक विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः अविवि-२०१०/प्र.क्र.१५२/१०/का-६**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**
तारीख: **११ ऑक्टोबर, २०१३**

**प्रस्तावना -**

मुस्लिम समाजाच्या मागासलेपणाचा अभ्यास करण्यासाठी केंद्र शासनाने गठीत केलेल्या न्या. सच्चर समितीने या समाजाची शैक्षणिक व आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची असल्याचे निदर्शनास आणले आहे. तसेच मदरसांमध्ये राहून शिक्षण घेत असलेली बहुतांश मुले ही अत्यंत गरीब आर्थिक परिस्थितीतील असतात. याद्दष्टिने मा. पंतप्रधानाच्या नवीन १५ कलमी कार्यक्रमांतर्गत कलम ४ च्या अनुषंगाने राज्यातील अल्पसंख्याकांचा शैक्षणिक विकास आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अल्पसंख्याक विकास विभागामार्फत मदरसांमध्ये पारंपारिक धार्मिक शिक्षणाबरोबरच विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दू हे विषय शिकविण्यासाठी तसेच मदरसांना पायाभूत सुविधासाठी व ग्रंथालयासाठी अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

मदरशांमध्ये शिकत असलेल्या विविध वयोगटातील विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पारंपारिक धार्मिक शिक्षणाबरोबरच विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दू या विषयांचे शिक्षण देणे, मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इ. ९ वी, इ. १० वी, ११ वी व १२ वी तील तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती देणे, परिणामी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये वाढ होऊन त्यांची रोजगार क्षमता वाढून आर्थिक दर्जा सुधारण्यास मदत होईल याद्दष्टिने मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी पायाभूत सुविधा, ग्रंथालयासाठी अनुदान देणे व शिक्षकांच्या मानधनासाठी अनुदान देण्याची डॉ.झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना पुढीलप्रमाणे राबविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

राज्यातील धर्मादाय आयुक्त अथवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत मदरशांना या योजनेचा लाभ देण्यात येणार असून नोंदणी करुन ३ वर्ष पूर्ण झालेल्या तसेच अल्पसंख्याक बहुल जिल्हयातील व तालुक्यातील मदरशांना या योजनेत प्राधान्य देण्यात येणार आहे. त्यानुसार प्रथम वर्षी या योजनेचा लाभ घेणास इच्छुक असलेल्या २०० मदरशांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. सदरहू योजनेंतर्गत मदरसांना खालील तीन प्रमुख बाबींसाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.

**अ) मदरसांना पायाभूत सुविधांसाठी अनुदान :-**

राज्यातील धर्मादाय आयुक्त अथवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत मदरशांना खालील पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी जास्तीत जास्त रुपये २.०० लक्ष इतक्या मर्यादेपर्यंत अनुदान दिले जाईल.

(१) मदरसांच्या इमारतीचे नुतनीकरण व डागडुजी
(२) पेय जलाची व्यवस्था करणे
(३) प्रसाधन गृह उभारणे व त्याची डागडुजी करणे
(४) विद्यार्थ्यांसाठी आवश्यक फर्निचर
(५) मदरसाच्या निवासस्थानात इन्व्हर्टर ची सुविधा उपलब्ध करणे
(६) मदरसांच्या निवासी इमारतीचे नुतनीकरण व डागडुजी
(७) संगणक, हार्डवेअर, सॉफ्टवेअर, प्रिंटर्स इ.
(८) प्रयोगशाळा साहित्य, सायन्स कीट, मॅथेमॅटीक्स कीट व इतर अध्ययन साहित्य.

या पायाभूत सुविधांपैकी एका प्रयोजनासाठी फक्त एकदाच अनुदान दिले जाईल. तथापि, मदरशांचे इमारतीचे आकारमान, क्षेत्रफळ तसेच विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेता गतवर्षी निर्माण केलेल्या सुविधा अपुऱ्या पडत असल्याचे योग्य समर्थन प्रस्तावात नमूद केल्यास, अशा अपवादात्मक परिस्थितीत पुन्हा त्याच सुविधांसाठी मागणी केलेले प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीसमोर विचारार्थ ठेवण्यात येतील. निवड समिती प्रस्तावातील समर्थन विचारात घेऊन योग्य निर्णय घेईल. याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

याशिवाय ग्रंथालय व प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी पुस्तक संच देण्यासाठी बुक बँक सुविधा पुरविण्यासाठी तसेच प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील शैक्षणिक साहित्य, कंपास बॉक्स इ. उपलब्ध करुन देण्यासाठी एका मदरशाला एकदाच रुपये ५०,०००/- अनुदान उपलब्ध करुन दिले जाईल तद्नंतर प्रति वर्षी रुपये ५,०००/- इतके अनुदान यासाठी दिले जाईल.

**ब) <u>मदरसांमध्ये नेमण्यात येणाऱ्या शिक्षकांचे मानधन:-</u>**

राज्यातील नोंदणीकृत मदरसांमध्ये पारंपारिक धार्मिक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार आणि वयोगटानुसार धार्मिक शिक्षणाबरोबरच विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दू या विषयाचे शिक्षण देण्यासाठी डी.एड. अथवा बी.एड. शिक्षक नेमण्यात येतील आणि त्यांना खालीलप्रमाणे मानधन देण्यात येईल. प्रत्येक मदरसांमध्ये नियुक्त केलेल्या जास्तीत जास्त ३ शिक्षकांचे मानधन अल्पसंख्याक विकास विभागामार्फत देण्यात येईल.

१) ६ ते १२ वयोगटातील विद्यार्थ्यांना वरील विषय शिकविण्यासाठी डी.एड. शिक्षक कंत्राटी पध्दतीने नेमण्यात येतील आणि त्यांना रुपये ६,०००/- प्रति महिना मानधन देण्यात येईल.
२) १३ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांना माध्यमिक स्तरावरील विषय शिकविण्यासाठी (बी.ए. बी.एड. आणि / बी. एस.सी. बी.एड.) शिक्षक कंत्राटी पध्दतीने नेमण्यात येतील आणि त्यांना प्रत्येकी रुपये ८,०००/- प्रति महिना मानधन देण्यात येईल.
३) कमीत कमी २० विद्यार्थी असतील अशा मदरसांना याचा लाभ देण्यात येईल
४) विद्यार्थी व शिक्षक यांचे प्रमाण ४०:१ असे राहील.

५) मदरसांमध्ये १३ ते १८ वयोगटातील ४० किंवा ४० पेक्षा कमी मुले असतील तर एक शिक्षक (बी.ए. बी.एड. / बी.एस.सी. बी.एड.) नेमण्यात येईल व दुसरा शिक्षक अभ्यागत पध्दतीने प्रति तास रु. २००/- याप्रमाणे वर्षातील ३०० तासांसाठी नेमण्यात येईल.

६) सद्य:स्थितीत उपरोक्त अर्हता प्राप्त कार्यरत असणारे, मान्यताप्राप्त इतर शाळांमधील ज्येष्ठ शिक्षकांनी इच्छुकता दर्शविल्यास मदरसांमध्ये शिकविण्यासाठी त्यांना प्रति तास रु. २००/- प्रमाणे मानधन देण्यात येईल.

७) सदर योजनेंतर्गत Teacher Eligibility Test (T.E.T) उत्तीर्ण शिक्षकांची नियुक्ती संबंधित मदरसा चालविणाऱ्या संस्थेमार्फत करण्यात येईल. T.E.T. शिक्षक उपलब्ध न झाल्यास B.Sc B.Ed/B.A.B.Ed/D.Ed. शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल.

८) वरील विषय शिकविण्यासाठी संस्थाचालक मराठी/उर्दू/इंग्रजी/हिंदी यापैकी एका माध्यमाची निवड करतील व त्यानुसार शिक्षकांची नेमणूक करण्यात येईल.

**क) <u>मदरसांमधील शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती :-</u>**

मदरसामध्ये रहाणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी, धार्मिक शिक्षणाबरोबरच शासनमान्य शाळेमध्ये माध्यमिक शिक्षणासाठी इ. ९ वी, १० वी, ११ वी व १२ वी ला सन २०१३-१४ पासून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेखाली दरवर्षी रुपये ४,०००/- (इयत्ता ९ वी व १० वी) आणि रुपये ५,०००/- (इयत्ता ११ वी, इयत्ता १२ वी आणि आय.टी.आय.) शिष्यवृत्ती (दोन सत्रात विभागून दोन हप्त्यामध्ये) देण्यात येईल. यासाठी विद्यार्थ्याची शाळेमधील उपस्थिती किमान ७५% असणे आवश्यक आहे. सदरच्या शिष्यवृत्तीचा लाभ राज्यातील सुरुवातीला १,००० विद्यार्थ्यांना देण्यात येईल. याबाबत इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिकणारे ६०० विद्यार्थी आणि कनिष्ठ महाविद्यालयामध्ये / आय.टी.आय. मध्ये शिकणारे ४०० विद्यार्थी अशी विभागणी करण्यात येईल. शिष्यवृत्तीसाठी यादी तयार करताना पालकांच्या उत्पन्नाच्या चढत्या क्रमाने तयार करण्यात येईल. शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीयकृत बँक खात्यामध्ये जमा केली जाईल. यासाठी विद्यार्थ्यांकडे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक आहे. जे विद्यार्थी केंद्र शासन व राज्य शासनाच्या इतर शिष्यवृत्तीचा लाभ घेत असतील त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. शिष्यवृत्ती प्रदान करण्याबाबतची कार्यपध्दती यथावकाश निर्धारित करण्यात येईल.

- **<u>योजनेची कार्यपध्दती :-</u>**

१) या योजनेंतर्गत अनुदान मिळविण्यासाठी पात्र असलेल्या इच्छुक नोंदणीकृत मदरशांनी विहित अटी आणि शर्तींची पूर्तता करुन विहित नमुन्यातील अर्जासह परिपूर्ण प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे विहित मुदतीत सादर करावा. या प्रस्तावात वयोगटनिहाय विद्यार्थ्यांची संख्या, आवश्यक असलेल्या शिक्षकांची संख्या, आवश्यक असलेली शिष्यवृत्तीची रक्कम इ. चा समावेश असावा.

२) विहित मुदतीत प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावांची जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीमार्फत या शासन निर्णयात नमूद निकषांनुसार छाननी करण्यात येईल. छाननी अंती पात्र

ठरलेल्या नोंदणीकृत मदरशांची यादी संबंधित जिल्हाधिकारी आपल्या शिफारसींसह आणि निधीच्या मागणीसह अल्पसंख्याक विकास विभागाकडे सादर करतील. सदर समितीची रचना पुढीलप्रमाणे राहील.

**योजनेंतर्गत प्राप्त अर्जांची छाननी करण्याकरिता उच्चस्तरीय निवड समिती :-**

अ) जिल्हाधिकारी अध्यक्ष

ब) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद; सदस्य

क) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) सदस्य

ड) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) सदस्य

इ) जिल्हा नियोजन अधिकारी / निवासी उपजिल्हाधिकारी सदस्य सचिव

१)

या योजनेकरिता संबंधित जिल्हाधिकारी हे नियंत्रण अधिकारी राहतील. जिल्हाधिकारी यांना त्यांच्या नियंत्रणाखालील योग्य त्या अधिकाऱ्यास या योजनेसाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करता येईल. लाभार्थी मदरसांना निधीचे वितरण थेट त्यांच्या बँक खात्यामध्ये इ.सी.एस. द्वारा जमा करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. सदर योजनेच्या प्रशासकीय कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकरिता रुपये २०,०००/- आणि जिल्हा शिक्षणाधिकारी कार्यालयाकरिता रुपये २०,०००/- या प्रमाणे एकूण रुपये ४०,०००/- संबंधित जिल्हाधिकारी यांना अनुज्ञेय राहील.

- **<u>योजनेच्या अटी व शर्ती :-</u>**

  १) सदर योजनेचा लाभ राज्यातील धर्मादाय आयुक्त अथवा वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत असलेल्या मदरसांना दिला जाईल.

  २) प्रथम वर्षी सदर योजनेचा लाभ २०० मदरसांना दिला जाईल. यापेक्षा जास्त प्रस्ताव प्राप्त झाल्यास नोंदणी करुन ३ वर्ष पूर्ण झालेले मदरसे आणि अल्पसंख्याक बहुल जिल्हयातील व तालुक्यातील मदरशांना प्राधान्य याप्रमाणे देण्यात येईल.

  ३) ज्या मदरसांना Scheme for Providing Quality Education in Madarasa (SPQEM) या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत लाभ मिळाला आहे अशा मदरसांना ही योजना अनुज्ञेय राहणार नाही

  ४) शासनाकडून या योजनेंतर्गत प्राप्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र मदरसांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे सादर करणे अनिवार्य आहे. यासंदर्भात काही तक्रारी प्राप्त झाल्यास आवश्यकतेनुसार शिक्षणाधिकारी / जिल्हाधिकारी यांचेमार्फत तपासणी करण्यात येईल.

  ५) सदहरहू योजनेचा लाभ घेणाऱ्या मदरशांनी, मदरशांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना यथावकाश त्यांनी प्राप्त केलेल्या अर्हतेनुसार शासनमान्यताप्राप्त शाळेमार्फत इ. १० ची/इ.१२ वी च्या परिक्षेस बसण्याबाबत किंवा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेश घेण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

६) मदरशांमध्ये विज्ञान/गणित/ समाजशास्त्र/हिंदी/ मराठी व इंग्रजी इ. विषयांचा अभ्यासक्रम राज्यशासनाच्या अन्य शाळांप्रमाणेच राहील. तसेच मदरशांमध्ये शिकविणाऱ्या शिक्षकांचे प्रतिदिन ५ तासिका याप्रमाणे कामाचे तास निश्चित करण्यात येतील.

अभ्यागत पध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या शिक्षकास प्रति तास रु. २००/- याप्रमाणे ३०० तासांसाठी नियुक्ती करण्यात यावी.

७) बुकबँक, लायब्ररी यासाठीचे अनुदान हे शालेय शिक्षण विभागाच्या अभ्यासक्रमाची पुस्तके खरेदी करण्यासाठी वापरण्यात यावे.

८) मदरसामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे दर तीन महिन्यानी त्यांच्यासाठी नेमलेले शिक्षक मूल्यमापन करतील यामध्ये विद्यार्थ्यांची लेखी/तोंडी परिक्षा घेण्यात येईल व याबाबतचा अहवाल प्रत्येक मे महिन्यामध्ये शिक्षणधिकारी यांच्यामार्फत शासनास सादर करतील.

९) या योजनेंतर्गत अनुदान देण्यात येणऱ्या मदरशांमधील धार्मिक शिक्षण किंवा दैनंदिन प्रशासन यामधील शासनाचा हस्तक्षेप असणार नाही.

- <u>अर्जासोबत खालील कागदपत्रे/कागदपत्रांच्या साक्षांकित सत्य प्रती जोडणे आवश्यक आहे.</u>

I. मदरशामध्ये विज्ञान,गणित,समाजशास्त्र, हिंदी, इंग्रजी, मराठी व उर्दू हे विषय शिकविले जाणार असल्याबाबतचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र (Undertaking ). (प्रपत्र-१)

II. संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत

III. इमारती / दालनाच्या दुरुस्तीचा प्रस्ताव असल्यास सदर इमारत संस्थेच्या मालकीची / भाडयाची / दानपत्राद्वारे प्राप्त असल्यास जमीन / इमारत याचे पी.आर. कार्ड/गाव नमुना/७/१२ उतारा/ नोंदणीकृत भाडेपट्टा पत्राचा उतारा/दानपत्र इ. च्या सत्यप्रती.

IV. संस्थेच्या सदस्यांच्या यादीची सत्यप्रत (प्रपत्र-२)

V. संस्थापन समयलेखे / ट्रस्ट डीड ची सत्यप्रत

१) संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या विद्यमान विश्वस्त/सदस्य यांची नावे दर्शविणाऱ्या वक्फ बोर्ड / धर्मादाय आयुक्तांमार्फत प्रदान करण्यात आलेल्या अनुसूची - I ची प्रत.

२) संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या विश्वस्त / सदस्यांच्या नावात बदल झाला असल्यास धर्मादाय आयुक्तांनी संस्थेस प्रदान केलेल्या फेरफार अहवालाची प्रत (अनुसुची III) किंवा फेरफारासाठी अर्ज केला असल्यास त्या अर्जाची प्रत

VI. नोंदणी करुन ४ वर्ष पूर्ण झालेल्या मदरशांच्या बाबतीत लगतच्या मागील चार वर्षापैकी किमान ३ वर्षाचे वार्षिक अहवाल / लेखापरिक्षण अहवाल (ताळेबंदासह). अन्य संस्थांचे उपलब्ध असलेले वार्षिक अहवाल/ लेखा परिक्षण अहवाल.

VII. दुरुस्ती करिता आर्किटेक्ट / लायसेंस्ड इंजिनियर यांनी प्रचलित डी.एस.आर. नुसार तयार केलेले तपशीलवार अंदाजपत्रक

VIII. मदरसांमध्ये शिकणाऱ्या मुले / मुलींची नांवे व वय याबाबतची ६ ते १२ वयोगट व १३ ते १८ वयोगट यांची गट शिक्षण अधिकारी / शिक्षण अधिकारी यांनी प्रमाणित केलेली यादी ( प्रपत्र-३)

IX. मदरशांतील मुले/मुली यांचा वयोगट व त्यातील संख्येनुसार आवश्यक असलेल्या शिक्षकांची संख्या, त्यांचे मानधनासाठी आवश्यक रक्कम इ. तपशील दर्शविणारे प्रपत्र (प्रपत्र-४)

X. अनुदान प्राप्त झाल्याबाबत आगाऊ पावती (प्रपत्र-५)

XI. खरेदी करावयाच्या वस्तू संदर्भात मागविलेल्या दरपत्रकांच्या प्रती.

XII. मदरशाच्या इमारतीचे/दुरुस्ती करावयाच्या भागाचे पोस्ट कार्ड आकाराचे रंगीत छायाचित्र.

या योजनेसाठी होणारा खर्च, २२३५ मुख्य लेखाशीर्ष, १- मागणी क्रमांक झेडई "सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, २०० इतर कार्यक्रम (०१) (३१) राज्य योजनांतर्गत योजना, राज्यातील नोंदणीकृत मदरसांना पायाभूत सुविधा आणि विषय शिक्षकांच्या वेतनाकरिता सहायक अनुदान (२२३५बी२२७) ३१ सहायक अनुदान" या लेखाशिर्षाखाली दर्शविण्यात यावा व त्या त्या आर्थिक वर्षात या शीर्षाखाली उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१०१११२४६५५२११४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ainul Chand Attar

Digitally signed by Ainul Chand Attar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=MDD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ainul Chand Attar
Date: 2013.10.14 11:12:35 +05'30'

**अैनुल अत्तार**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
४. मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
६. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग,
७. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
८. महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा) , मुंबई / नागपूर,
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
११. सर्व विभागीय आयुक्त,

१२. आयुक्त, नगरपालिका प्रशासन, मुंबई,
१३. सर्व जिल्हाधिकारी,
१४. आयुक्त, महानगरपालिका,
१५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१६. सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद
१७. सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका,
१८. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
१९. सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
२०. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी,
२१. सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
२२. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई, (पत्राने)
२३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी),
२४. निवडनस्ती,

## डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना.

### तपासणी सूची

**अनुक्रमांक :__________** **जिल्हा : ______** **दिनांक: ______**

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नाव व पत्ता (दूरध्वनी / भ्रमणध्वनीसह) : ------------------------------------------<br><br>मदरशाचेनाव व संपूर्ण पत्ता (दूरध्वनी / भ्रमणध्वनीसह) : --------------------------------------- | | |
| **अ.क्र.** | **तपशील** | **आहे / नाही किंवा तपशील** |
| १. | पूर्ण भरलेला अर्ज (परिशिष्ट-अ) | |
| २. | प्रपत्र - १.प्रतिज्ञापत्र (स्वंयसाक्षांकित) | |
| ३. | नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत | |
| ४. | पी.आर. कार्ड/गाव नमुना ७/१२ उतारा/भाडेपावती/दानपत्र (वक्फनामा) | |
| ५. | प्रपत्र - २ सदस्यांची यादी | |
| ६. | ट्रस्ट डीडची सत्यप्रत<br>१) अनुसूची - १. | |
| | २)फेरफार अहवालाची प्रत (अनुसूची- (३) ) | |
| ७. | वार्षिक अहवाल (लगतच्या मागील चार पैकी ३ वर्षाचे) किंवा उपलब्ध असतील त्यानुसार | |
| ८. | अंदाजपत्रक (बांधकामा करिता मागणी केलेली असल्यास) | |
| ९. | प्रपत्र - ३ पटसंख्येचा दाखला | |
| १०. | प्रपत्र- ४ शिक्षक संख्या व मानधन | |
| ११. | प्रपत्र-५ आगाऊ पावती | |
| १२. | दरपत्रकाची प्रत | |
| १३. | इमारतीचे छायाचित्र | |
| १४. | मागणीची एकूण रक्कम व सुविधांचे स्वरुप | |
| १५. | समितीची शिफारस मान्य/ अमान्य | |
| १६. | शासनातर्फे अंतिमत: अनुदानास पात्र/अपात्र | |

## परिशिष्ट - अ

| संस्थेच्या **अध्यक्षांचे** गट शिक्षण अधिकारी/ शिक्षण निरिक्षक/ उप शिक्षणाधिकारी यांनी सांक्षाकित केलेले छायाचित्र | संस्थेच्या **सचिवांचे** गट शिक्षण अधिकारी/ शिक्षण निरिक्षक/ उप शिक्षणाधिकारी यांनी सांक्षाकित केलेले छायाचित्र |
|---|---|

## महाराष्ट्र शासन, अल्पसंख्याक विकास विभाग
## डॉ.झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना - अर्जाचा नमूना

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अ) मदरसाचे पूर्ण नांव<br>आ) मदरसाचा पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता (दूरध्वनी क्र.website व email सह) | :<br>: | |
| २) | मदरसा चालविणाऱ्या संस्थेचे नांव व पूर्ण पत्ता (दूरध्वनी क्र.website व email सह) | : | |
| ३) | अ) संस्थेच्या अध्यक्षांचे पूर्ण नांव व पत्ता (दूरध्वनी मोबाईल क्र., भ्रमणध्वनी क्र. सह)<br>आ) संस्थेच्या सचिवांचे पूर्ण नांव व पत्ता (दूरध्वनी क्र. सह)<br>(संस्थेच्या सदस्यांचा तपशील प्रपत्र-२ मध्ये द्यावा) | :<br>: | |
| ४) | संस्थेच्या नोंदणीचा क्रमांक<br>अ) वक्फ कायदा,<br>आ) सार्वजनिक न्यास नोंदणी अधिनियम, १९५० अंतर्गत | :<br>: | |
| ५) | मदरशाचे खाते असलेल्या राष्ट्रीयकृत बँकेचे नाव, खाते क्रमांक (IFSC कोडसह) | : | |
| ६) | मदरशातील पटसंख्या<br>( वयोगट निहाय स्वतंत्रपणे तक्ता प्रपत्र-३ मध्ये द्यावा.) | : | |
| ७) | मदरशातील अभ्सयासक्रमाचे माध्यम | : | मराठी/उर्दू/ इंग्रजी/हिंदी |
| ८) | मदरसांमधील शिक्षक/शिक्षिकांची संख्या<br>(धार्मिक शिक्षक वगळून)<br>(नियुक्तीचा दिनांक, शैक्षणिक पात्रता, प्रशिक्षित/ अप्रशिक्षित इ. माहिती स्वतंत्रपणे जोडावी) | : | |
| ९) | मदरसांकडील सोयी सुविधा :<br>अ) मदरसा संस्थेच्या मालकीच्या इमारतीमध्ये चालविली जाते की भाडयाच्या इमारतीमध्ये ? तपशील द्यावा.<br>आ) i) बांधकामाचा तपशील (सध्या उपलब्ध) | : | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | शैक्षणिक कार्य | निवासस्थान | स्वच्छता गृह | एकूण क्षेत्रफळ |
| खोल्यांची संख्या | | | | |
| क्षेत्रफळ | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १०) | मदरसांमधील पिण्याच्या पाण्याच्या सुविधांचा तपशील | : | |
| ११) | मदरसाच्या मालकीची/भाडयाची स्थावर जंगम मालमत्ता आहे काय ? (७/१२ उत्ताराची प्रत जोडावी) असल्यास तपशील द्यावा. | : | |
| १२) | मदरसामध्ये इतर उपक्रम राबविले जातात काय ? तपशील | : | |

१३) मागणी केलेल्या रकमेचा तपशील :

**अ). भौतिक व शैक्षणिक सुविधा :**

| अ. क्र. | निर्माण करावयाच्या सुविधा | संख्या | दुरुस्तीची/बांधकामांची / खरेदीची किंमत प्रति नग | आवश्यक रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | **मदरसाच्या इमारतीची दुरुस्ती/ नूतनीकरण** | | | | |
| | अ) मदरसा खोल्यांची डागडुजी/दुरुस्ती | | | | |
| | ब) छत दुरुस्ती | | | | |
| | क) मदरसा खोल्या मध्ये फरशी बसविणे | | | | |
| | ड) इतर | | | | |
| २ | **पिण्याच्या पाण्याची सुविधा** (कूलर/फिल्टर सह) | | | | |
| ३ | **स्वच्छतागृहे** | | | | |
| | अ) नवीन स्वच्छतागृहे बांधणे | | | | |
| ४ | **शैक्षणिक कार्यासाठी आवश्यक फर्निचर** | | | | |
| | अ)बेंचेस/डेस्क/टेबल कपाट/खुर्च्या | | | | |
| ५ | **इनव्हर्टरची सुविधा निर्माण करणे (मुंबई शहर व उपनगरे वगळून)** | | | | |
| ६ | **मदरसांच्या निवासी इमारतीचे नुतनीकरण व डागडुजी** | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | **संगणक कक्ष** | | | | |
| | अ) संगणक संख्या | | | | |
| | ब) प्रिंटर्स | | | | |
| | क) सॉफटवेअर्स | | | | |
| | ड) इतर साहित्य | | | | |
| ८. | **प्रयोग शाळा उभारणे/अद्ययावत करणे (सविस्तर तपशिल द्यावा)** | | | | |
| ९. | **ग्रंथालयासाठी** | | | | |
| | अ) बुक बँक/ क्रमिक पुस्तके खरेदी | | | | |
| | ब) इतर पुस्तके खरेदी | | | | |

**ब) शिक्षकाचे मानधन: रू.__________**

मागणी केलेली एकूण रक्कम :- एकूण ((अ) +(ब))    रु...........................

**मी/** आम्ही श्री./श्रीमती ..................................व श्री./श्रीमती ....................... असे प्रमाणित करतो की,आमच्या ..................................संस्थेव्दारा संचलित .................................... या मदरसांसाठी अनुदान मागणी संदर्भात उपरोक्त दिलेल्या सर्व माहितीची पडताळणी केली असून सर्व माहिती सत्य व बरोबर आहे.

सही -___________

नांव -___________

हुद्दा - सचिव अध्यक्ष

शिक्का -

## डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना

## प्रतिज्ञापत्राचा नमुना

### प्रपत्र - १

मी/ आम्ही श्री./श्रीमती ..................................व श्री./श्रीमती ...................... असे प्रमाणित करतो की, आमच्या ....................................संस्थेव्दारा संचलित ................................ या मदरशासाठी **नोंदणीकृत मदरशांना आधुनिकीकरणासाठी अनुदान योजना** करुन देण्याबाबतच्या महाराष्ट्र शासन, अल्पसंख्याक विकास विभागाच्या योजनेंतर्गत विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह सादर केला आहे. अनुदान मागणी संदर्भात अर्जामध्ये दिलेल्या सर्व माहितीची मी / आम्ही पडताळणी केली असून सर्व माहिती सत्य व बरोबर आहे.

मी / आम्ही प्रमाणित करतो की, आमच्या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित मदरसांमध्ये विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, इंग्रजी, मराठी व उर्दू हे विषय शिकविले जात आहेत.

मी / आम्ही प्रमाणित करतो की, अर्जामध्ये अनुदान मागणी केलेल्या पायाभूत सोयी-सुविधा आमच्या मदरसासाठी आवश्यक असून या योजनेंतर्गत निधी उपलब्ध झाल्यास सदर निधी अर्जामध्ये प्रस्तावित केलेल्या पायाभूत सोयी-सुविधांसाठी योग्यरित्या वापरला जाईल.

मी / आम्ही असेही प्रपादन करतो की, या निधीचा गैरवापर झाल्यास अथवा अर्जामधील माहिती असत्य आढळून आल्यास आमच्या विरुध्द / संस्थेविरुध्द कायदेशीर / दंडात्मक कार्यवाही केली जाऊ शकते तसेच संस्थेचा अर्ज रद्दबातल ठरु शकतो आणि मंजूर अनुदान शासनास परत केले जाईल याची आम्हांस जाणीव आहे.

मी / आम्ही याव्दारे हमी देतो की आमच्या संस्थेस मंजूर झालेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र **(प्रपत्र -५ नुसार)** खरेदीच्या पावत्यांच्या सत्यप्रतीसह संस्था अनुदान मंजूरीच्या तारखेपासून **९० दिवसांच्या आंत** शासनास सादर करण्यात येईल.

| | |
|---|---|
| सही -___________ | सही -____________ |
| नांव -____________ | नांव -____________ |
| पदनाम - सदर मुद्दरीस | पदनाम - सचिव अध्यक्ष |
| शिक्का - | शिक्का - |

डॉ.झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना

प्रपत्र - २

संस्थेच्या सदस्यांची यादी

| अ.क्र. | सदस्याचे पूर्ण नाव<br>(आडनांव प्रथम) | पूर्ण पत्ता<br>भ्रमणध्वनी क्रमांक | पदनाम | छायाचित्र |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

सही -___________

नांव -___________

पदनाम - सचिव अध्यक्ष

शिक्का -

## डॉ.झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना

### प्रपत्र -३

### इयत्ता निहाय विद्यार्थी संख्या

प्रमाणित करण्यात येते की, ............................................................... या संस्थेव्दारा संचलित............................................................. या मदरशामध्ये वर्ष ................. मध्ये खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांची पटसंख्या आहे. असे ही प्रमाणित करण्यात येते की, संस्थेने अर्जामध्ये केलेली मागणी वाजवी असून संस्थेस आर्थिक मदत मंजूर करण्यास शिफारस आहे.

**वयोगट :__ वर्ष ते __ वर्ष**

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नांव | मुलगा/मुलगी | वय |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

**( वयोगट ६ ते १२ वर्ष आणि वयोगट १३ ते १८ वर्ष याची माहिती दोन वेगवेगळया तक्त्यात द्यावी)**

एकूण विद्यार्थी संख्या :-

सही - ____________ सही -____________

नांव - ____________ नांव -____________

पदनाम - सदर मुद्दरीस पदनाम -गट शिक्षणअधिकारी/ शिक्षण निरिक्षक/ उप शिक्षणाधिकारी / सह संचालक

शिक्का - ____________ शिक्का - ____________

जिल्हा - ____________

## डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना

### प्रपत्र -४

### आवश्यक शिक्षकांची संख्या व मानधनाची रक्कम

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचा वयोगट | विद्यार्थ्यांची एकूण संख्या | आवश्यक शिक्षकांची संख्या | मानधनाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | **६ ते १२ वर्ष** | | | |
| २ | **१३ ते १८ वर्ष** | | | |
| | एकूण | | | |

सही - ____________  सही -____________

नांव - ____________  नांव -____________

पदनाम - सदर मुद्दरीस  पदनाम - अध्यक्ष / सचिव

शिक्का - ____________  शिक्का - ____________

जिल्हा - ____________

## डॉ.झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना

**प्रपत्र – ५**

**(आगाऊ पावती)**

मदरसांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजनेतंर्गत, सन................या वर्षी आमच्या......................................................संस्थेच्या.......................................... मदरसा शाळेस महाराष्ट्र शासन, अल्पसंख्याक विकास विभागाकडून मंजूर करण्यात आलेले अनुदान रुपये ................/- (अक्षरी रुपये ................................................) ............................................यांच्याकडून प्राप्त झाले.

सही -____________

नांव - ____________

पदनाम - सचिव / अध्यक्ष

शिक्का -